# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः23.11.2025** **वारःरविवार**

---

•भारताच्या संस्कृतीत रुजलेला एकात्मिक मानवaतावाद संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरेल; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत प्रतिपादन

•केंद्र सरकारनं लागू केलेल्या कामगारविषयक संहितांचं समाजाच्या विविध स्तरातून स्वागत

•नागपूर इथं ६१५ खाटांच्या अद्ययावत रुग्णालयासह नवे पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम आणि

•ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्य सेनचा अंतिम फेरीत प्रवेश

<u>**पंतप्रधान-जी२०**</u>

संपूर्ण जगानं एकत्रितपणे प्रगती करायची असेल, तर भारताच्या संस्कृतीत रुजलेला एकात्मिक मानवतावाद मार्गदर्शक ठरेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल. दक्षिण आफ्रिकेतल्या जोहान्सबर्ग इथं जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत ते काल बोलत होते.

जी-२० अंतर्गत जागतिक पारंपरिक ज्ञान भांडाराची स्थापना, जी-२० आफ्रिका-कौशल्यवाढ उपक्रमाची सुरुवात, जी-२० जागतिक आरोग्य प्रतिसाद पथकाची निर्मिती, अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी उपक्रम असे महत्वपूर्ण प्रस्ताव मोदी यांनी आपल्या भाषणातून मांडले.

जी-२० शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी विविध देशांच्या प्रमुख नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. यूकेचे पंतप्रधान किएर स्टार्मर, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि कॅनडाचे पंतप्रधान माइक कार्नी तसंच संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्याशीही त्यांनी चर्चा केली.

**इंट्रो**-

केंद्र सरकारनं लागू केलेल्या कामगारविषयक संहितांचं समाजाच्या विविध स्तरातून स्वागत केलं जात आहे.

या संहितांमुळे औपचारिक रोजगार निर्मिती, सामाजिक सुरक्षिततेचं जाळं यांच्यात वाढ होईल आणि कायदेपालन सुलभ होईल असं औद्योगिक संस्था आणि सल्लागार कंपन्यांनी म्हटलं आहे.

तंत्रज्ञान, कर्मचारी, सल्लागार आणि कायदे क्षेत्रातील उद्योग प्रमुखांनी या सुधारणांचं स्वागत करताना या संहिता समयोचित, कामगार-केंद्रित आणि आधुनिक अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असल्याचं म्हटलं आहे.

भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव गिरीश आर्य म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या बाजूनं करण्यात आलेली ही सर्वात मोठी सुधारणा आहे.

नॅशनल फ्रंट ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सचे अध्यक्ष डॉ. दीपक जयस्वाल म्हणाले की, असंघटित क्षेत्रात सुमारे पन्नास कोटी लोक काम करतात आणि नवीन कामगार संहितेच्या अंमलबजावणीमुळं त्यांचं किमान वेतन आता पूर्णपणे सुनिश्चित होईल.

कामगारांचे वेतन, सुरक्षितता आणि सामाजिक सुरक्षिततेबाबत अधिक स्पष्टता कामगारांना भक्कम आधार देईल असं नॅसकॉमनं म्हटलं आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि आंतरराष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संघटनेसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संघटनांनी देखाली चार कामगार संहिता अंमलात आणण्याच्या सरकारच्या घोषणेचं स्वागत केलं आहे.

सुधारित कामगार संहितेबाबत, पुण्यातील रिक्षाचालक गोपाळ बांदल यांची ही प्रातिनिधीक प्रतिक्रिया...

**ट्रान्सक्रिप्शन**

ओला आणि रॅपिडो सारख्या कंपनीत काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. अचानक कंपनीची ओळख ब्लॉक झाली, तक्रारी वाढल्या आणि न्यायासाठी विचारायचे असलेले अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. आरोग्य आणि सुरक्षा यांसारख्या अनेक गंभीर समस्या होत्या. या निर्णयामुळे आमचे प्रश्न सुटले आहेत. या पार्श्वभूमीवर घेतलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो.

**ताडोबाव्याघ्र**

विदर्भातील विविध विकास कामांबरोबरच तिथली जंगल संपदा राखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प खासगी भागीदारांच्या सहयोगानं हाती घेण्यात आला आहे. राज्यातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प असून जैवविविधता टिकवणाऱ्या पद्धतीनं निसर्गाचा समतोल राखण्याचं त्यात उद्दिष्ट आहे.

**रुग्णालय**

नागपूर इथं वैद्यकीय उपचाराच्या दर्जेदार सुविधा आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी नवे पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम सुरू व्हावेत यासाठी ६१५ खाटांच्या अद्ययावत रुग्णालयासह नवे पदव्युत्तर आणि अतिविशेषोपचार अभ्यासक्रम सुरु करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाशी संलग्न असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि संशोधन केंद्राची श्रेणीवाढ करुन तिथं ही व्यापक व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

**इंट्रो**

शेती उत्पादनांची शाश्वती आणि शुद्धता राखण्याच्या हेतूनं केंद्र सरकारनं सीपीपी म्हणजे क्लिन प्लांट्स प्रोजेक्ट अर्थात रोगमुक्त रोपांच्या निर्मितीसाठीचा उपक्रम सुरु केला आहे. राज्यात द्राक्षं, डाळिंबं आणि संत्र्याची रोगमुक्त रोपं मान्यवर संशोधन संस्थांच्या सहकार्यानं तयार करुन अधिकृत रोपवाटिकांद्वारे ती शेतकऱ्यांना पुरविण्यात येणार आहेत. या अनुषंगानं रोगमुक्त रोपे म्हणजे नेमकं काय हे जाणून घेण्याचा हा प्रयत्न...

**स्क्रीप्ट**

रोपं रोगमुक्त आहेत याची खात्री करण्यासाठी प्रथम वनस्पतीची सामग्री मिळवून त्याची चाचणी केली जाते; ती संक्रमित असेल तर, त्यातील रोगजनक नष्ट करण्यासाठी ऊती संवर्धन, उष्णता किंवा क्रायो-थेरपी यासारख्या उपचारांचा वापर केला जातो. रोगमुक्त सामग्री, नंतर रोगमुक्त मातृ वनस्पतींची निर्मिती आणि देखभाल करण्यासाठी

वापरली जाते. या वनस्पतींचा प्रसार मान्यताप्राप्त रोपवाटिकांद्वारे शेतकऱ्यांना केला जातो. पिकाचं उत्पादन आणि त्याची गुणवत्ता या दृष्टिनं भारतीय शेतमाल जगाच्या तुलनेत सुधारण्याला भरपूर वाव आहे. त्या दृष्टिनं रोगमुक्त रोपे हा एक भाग आहे. शेतातल्या आणि बागांमधल्या पिकांवर प्रचंड प्रमाणात औषधांची फवारणी केली जाते. किडींच्या पिढ्या अतिशय वेगानं स्वतःमध्ये परिवर्तन करत असल्यानं नवनवीन औषधं देखील निष्प्रभ होत आहेत. या पार्श्वभूमीवर रोगमुक्त रोपे तयार करण्यासाठी पुणे, सोलापूर आणि नागपूर इथं संशोधन संस्थांच्या सहयोगानं काम सुरु आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, प्रशांत जाधव, पुणे.

**<u>एसटी</u>**

शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळेत जाताना अथवा घरी परत येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बस वेळेवर न आल्यास किंवा अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी यासाठी लवकरच एसटी महामंडळाची ' हेल्पलाइन ' सुरू करण्यात येत आहे. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिल्यानंतर तिथे उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

**<u>इफफी</u>**

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात काल 'इट वॉज जस्ट ॲन ॲक्सिडेंट', सूर्या बालकृष्णन यांचा 'दीपा दीदी', 'मॉस्किटोज' आदी चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. इटालियन दिग्दर्शक व्हॅलेंटिना बर्टानी आणि निकोल बर्टानी यांनी आकाशवाणीशी मॉस्किटोज चित्रपटाबद्दल संवाद साधला. प्रतिष्ठित गोल्डन पीकॉक पुरस्कारासाठी ह्या चित्रपटाचं नामांकन झालं आहे. अनुपम खेर त्यांचा 'तन्वी द ग्रेट' हा चित्रपटही प्रदर्शित करण्यात आला. एका खंबीर स्वमग्न मुलीची ही गोष्ट आहे. हिमाचल प्रदेश, तामिळनाडू आणि जम्मू आणि काश्मीरमधील कलाकारांनी काल रंगतदार लोकनृत्य सादर करून या महोत्सवाची शोभा वाढवली.

**<u>रत्ना.सा.संमेलन</u>**

मराठी ही ज्ञानभाषा होण्यासाठी साहित्य संमेलनांवर खर्च करण्यापेक्षा जगभरातल्या वेगवेगळ्या भाषांमधलं दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी सरकारनं अनुदान दिलं पाहिजे. अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केली. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळातर्फे काल रत्नागिरीत एकदिवसीय जिल्हा साहित्य संमेलन भरवण्यात आलं होतं त्यावेळी संमेलनाच्या

अध्यक्षस्थानावरून डॉ. गवस बोलत होते. छोटी संमेलनं जरूर व्हावीत; पण ती लोकांनी निधी उभारून केली पाहिजेत, तसंच सरकारनं मराठी शाळा सशक्त कराव्यात,असंही गवस म्हणाले.

कुडाळ-पदयात्रा

'मेरा युवा भारत' या उपक्रमांतर्गत कुडाळ मध्ये काल जिल्हास्तरीय एकता पदयात्रा काढण्यात आली. या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. या पदयात्रेत प्रशासनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबरच अनेक शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.

**<u>अपघात</u>**

राज्यात दोन ठिकाणी झालेल्या अपघातांमधे ८ जणांचा मृत्यू झाला तर ८ जण जखमी झाले.

धाराशिव जिल्ह्यातल्या अणदूर जवळ काल सकाळी एका वाहन अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला तर ५ जण गंभीर जखमी झाले. धावत्या गाडीचं टायर फुटल्यानं चालकाचं नियंत्रण सुटून हा अपघात झाला.

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथं शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या एका वाहन अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला, तर ३ जण गंभीर जखमी झाले.

**<u>क्रिकेट</u>**

गुवाहाटी इथं सुरु असलेल्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेनं काल पहिल्या दिवशी पहिल्या डावात दिवसअखेर ६ बाद २४७ धावा केल्या आहेत. कुलदीप यादवनं तीन बळी घेतले.

**<u>लक्ष्यसेन</u>**

भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत लक्ष्यने चायनीज तैपेईच्या चाऊ टिएन-चेन याचा १७-२१, २४-२२, २१-१६ असा पराभव केला. उत्कृष्ट नेट ड्रॉप्स, अचूक स्मॅश आणि आत्मविश्वासपूर्ण फटक्यांच्या बळावर लक्ष्यनं अंतिम फेरी गाठली.

**<u>हवामान</u>**

कोकणात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. अन्यत्र हवामान सूर्यप्रकाशयुक्त, कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार